**‘मराठी बालसाहित्य’ परिसंवाद**

**आयोजक – भाषा, वाङ्मय आणि संस्कृती अभ्यास संकुल, स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि साहित्य अकादेमी.**

**दिनांक १९ जुलै २०१९**

**स्थळ – भाषा वाङ्मय आणि संस्कृती अभ्यास संकुल**

साहित्य अकादमी आणि भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने ‘मराठी बालसाहित्य’ या विषयावर दिनांक शुक्रवार, १९ जुलै २०१९ रोजी परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी बालसाहित्याची वाटचाल, सद्यस्थिती, प्रयोगशिलता, भविष्यकालीन दिशा आणि दृकश्राव्य माध्यमांनी निर्माण केलेले बालकांपुढील विविध प्रश्न अशा विविध मुद्द्यांची चर्चा परिसंवादात व्हावी अशी अपेक्षा होती.



साहित्य अकादेमी
तथा
भाषा वाङ्मय एवं संस्कृति अभ्यास संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विश्वविद्यालय, नांदेड
के संयुक्त तत्त्वावधान में आयोजित

मराठी बालसाहित्य

विषयक परिसंवाद में आप सादर आमंत्रित हैं.


शुक्रवार, 19 जुलाई 2019

भाषा वाङ्मय एवं संस्कृति अभ्यास संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विश्वविद्यालय, नांदेड - 431 606

कार्यक्रम

उद्घाटन सत्र : पूर्वाह्न 10.00 से 11.00 बजे
स्वागत भाषण : कृष्णा किंबहुने
*क्षेत्रीय सचिव, साहित्य अकादेमी, मुंबई*
उद्घाटन वक्तव्य : सूर्यकांत सराफ
*सुप्रसिद्ध मराठी साहित्यकार*
बीज वक्तव्य : आबा महाजन
अध्यक्षीय वक्तव्य : उद्धव भोसले
*माननीय कुलपति, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विश्वविद्यालय*
धन्यवाद ज्ञापन : दिलीप चव्हाण
*संचालक, भाषा वाङ्मय एवं संस्कृति अभ्यास संकुल*
चाय : पूर्वाह्न 11.00 बजे
आलेख सत्र : पूर्वाह्न 11.30 से सायं. 4.00 बजे
अध्यक्ष : केशव देशमुख
आलेख : सुभाष विभुते, एकनाथ आव्हाड,
सलीम मुल्ला, पृथ्वीराज तौर, निवेदिता मदाने
भोजन : अपराह्न 1.30 से 2.30 बजे

इस अवसर पर साहित्य अकादेमी अपने प्रकाशनों की
प्रदर्शनी एवं बिक्री भी आयोजित कर रही है
उत्तरापेक्षी : 022-24135744, 24131948
ई-मेल : rs.rom@sahitya-akademi.gov.in



साहित्य अकादेमी
आणि
भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
ह्यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजिलेल्या

मराठी बालसाहित्य

विषयक परिसंवादास आपण सादर आमंत्रित आहात.

शुक्रवार, 19 जुलै 2019

भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड - 431 606

कार्यक्रम

उद्घाटनाचे सत्र : स.10.00 ते 11.00 वा.
स्वागताचे भाषण : कृष्णा किंबहुने
*प्रादेशिक सचिव, साहित्य अकादेमी, मुंबई*
उद्घाटनाचे भाषण : सूर्यकांत सराफ
*सुप्रसिद्ध मराठी साहित्यिक*
बीज भाषण : आबा महाजन
अध्यक्षीय भाषण : उद्धव भोसले
*माननीय कुलगुरु, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ*
आभार : दिलीप चव्हाण
*संचालक, भाषा वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुल*
चहा : स. 11.00 वा.
निबंधांचे सत्र : सकाळी 11.30 ते संध्या. 4.00 वा.
अध्यक्ष : केशव देशमुख
निबंध : सुभाष विभुते, एकनाथ आव्हाड,
सलीम मुल्ला, पृथ्वीराज तौर, निवेदिता मदाने
जेवण : दु. 1.30 ते 2.30 वा.

या चर्चासत्राच्या निमित्ताने साहित्य अकादेमी आपल्या
प्रकाशनांचे प्रदर्शन व विक्रीही आयोजित करीत आहे
संपर्क : (022)-24135744, 24131948
ई-मेल : rs.rom@sahitya-akademi.gov.in

दिनांक १९ जुलै २०१९ रोजी सकाळी १० वाजता स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठात ‘मराठी बालसाहित्य’ परिसंवादाचे उद्घाटन सुप्रसिद्ध बालसाहित्यिक आणि नाटककार सूर्यकांत सराफ यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. उद्धव भोसले हे होते. सुप्रसिद्ध कवी आबा महाजन यांनी यावेळी बीजभाषण केले. स्वागताचे भाषण साहित्य अकादमीचे प्रादेशिक सचिव कृष्णा किंबहूने यांनी केले. तर संकुलाचे संचालक डॉ. दिलीप चव्हाण यांनी आभार मानले.

साहित्य अकादमीचे प्रादेशिक सचिव कृष्णा किंबहूने आपल्या स्वागतपर भाषणात यांनी उद्घाटन समारंभात साहित्य अकादमीच्या वतीने सर्वांचे स्वागत केले व परिसंवादाच्या आयोजनाचा हेतू सांगितला. साहित्य अकादमीच्या वतीने बालसाहित्यासाठी स्वतंत्र बालसाहित्य पुरस्कार सुरु केला असुन या वर्षी तो सलीम मुल्ला

यांच्या ‘जंगल खजिन्याचा शोध’ या साहित्यकृतीला जाहिर झाल्याचे सांगितले. साहित्य अकादमीच्या वतीने सुरु असलेल्या विविध योजनांचीही त्यांनी माहिती दिली. प्रसारमाध्यमे बालकांची विचार प्रक्रिया कुंठीत करत असून, बालकांच्यातील एकलकोंडेपणा वाढला असल्याचेही ते म्हणाले. बालकांच्या दृकश्राव्य क्षमतेचे बलिदान वाचनात दिले जात नाही, वाचनामुळे बालकांच्या ज्ञानेंद्रियांचा पुर्ण वापर होतो आणि विचार कार्यप्रवण होतात असे किंबहूने म्हणाले. साहित्य अकादेमीच्या वतीने परिसंवादाच्या निमित्ताने विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये दोन दिवस ग्रंथ प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.














सूर्यकांत सराफ यांनी आपल्या उद्घाटनपर भाषणात अशाप्रकारची आयोजने मोठ्या संख्येने झाली पाहिजेत अशी अपेक्षा व्यक्त केली. बालसाहित्यिकांचे लक्ष बालवाचकांकडे कमी आणि पुरस्कारांकडे जास्त असल्याची खंतही त्यांनी बोलून दाखवली. मुलं एकलकोंडी झाली आहेत, काळाच्या पुढे जाऊन बालकांचा विचार व्हायला

हवा. मुलांना बोलतं करा, त्यांना वेळ द्या आणि प्रामुख्याने किशोरवयीन मुलांसाठी लिहा असा सल्ला सराफ यांनी यावेळी दिला.

बीजभाषणात आबा महाजन यांनी ‘अशा प्रयोगांमुळे बालसाहित्य दुय्यम साहित्य म्हटलं जाणार नाही’ अशा आशावादाने सुरुवात केली. मुलांची सदसदविवेकबुद्धी जागृत करुन देणारे साहित्य गरजेचे असल्याचे महाजन म्हणाले. राज्यात बालभवन असावे, बोलीभाषेतून लेखनाकडे बालसाहित्यिकांनी वळावे, वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यावर भर द्यावा, बालसाहित्याचे समीक्षक निर्माण व्हावेत अशा काही अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्या.

अध्यक्षीय समारोप करताना कुलगुरु डॉ उद्धव भोसले यांनी बालसाहित्य विषयक परिसंवादाच्या आयोजनासाठी संकुलाचे अभिनंदन केले. बालक, पालक, शिक्षक आणि समाजाला बदलत्या समाजव्यवस्थेत उपयोगी पडेल अशा साहित्याची निर्मिती झाली पाहिजे असे कुलगुरु म्हणाले.







उद्घाटन समारोहाचे सूत्रसंचालन डॉ. पृथ्वीराज तौर यांनी केले तर आभार डॉ दिलीप चव्हाण यांनी मानले. यावेळी डॉ. पृथ्वीराज तौर यांनी अनुवादीत केलेल्या ‘देशोदेशिच्या कथा’ या पॉकेट बुकचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले.

उद्घाटन सत्रानंतर चहाचा मध्यंतर झाला, त्यानंतर डॉ. केशव सखाराम देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली निबंध सत्राचे आयोजन करण्यात आले. हे सत्र सायंकाळी पाच वाजेपर्यंत चालले. या सत्रामध्ये एकनाथ आव्हाड (मुंबई), पृथ्वीराज तौर (नांदेड), निवेदिता मदाने (नवी दिल्ली) यांनी आपले शोधनिबंध सादर केले. साहित्य अकादमीचा बालसाहित्य पुरस्कार प्राप्त लेखक सलीम मुल्ला आणि सुभाष विभुते (आजरा) यांच्या निबंधाचे विनायक येवले आणि पी. विठ्ठल यांनी वाचन केले.

‘प्रसारमाध्यमे आणि बालसाहित्य’ या विषयावर एकनाथ आव्हाड यांनी मांडणी केली. कल्पनाप्रियता, अतार्किकता हे बालसाहित्याचे प्राण असतात असे सांगून मराठीतील महत्वाच्या मुलांच्या मासिकांच्या योगदानावर त्यांनी प्रकाश टाकला.








सुभाष विभुते यांचा शोधनिबंध ;भविष्यातील बालसाहित्य’ हा होता. लघुत्तमकथा, पोस्टर, गतिशील चित्रमाध्यम, उत्तम अनुवाद, सुलभीकरण, प्रसार माध्यमे, वाचन मूल्ये, भाषा विकसन, मूल्यरचना, बालकांनी केलेले लेखन अशा विविध मुद्द्यांचा उहापोह विभुते यांनी केला.

सलीम मुल्ला यांच्या निबंधात ‘निसर्गभान आणि बालसाहित्य’ या विषयावर मांडणी करण्यात अली होती. निसर्गाशी निगडीत बालसाहित्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

निवेदिता मदाने यांनी ‘प्रसारमाध्यमांचा बालसाहित्यावर प्रभाव’ या विषयावरील निबंध सादर केला. वाचन संस्कृतीवर भर देण्याची आवश्यकता त्यांनी बोलून दाखवली.

पृथ्वीराज तौर यांनी ‘मराठी बालसाहित्याचे संशोधन’ या विषयावर निबंध सादर केला. बालसाहित्याची सद्यस्थिती आणि भविष्यातील दिशा यांचा उल्लेख त्यांनी केला.

डॉ. केशव देशमुख यांनी अध्यक्षीय समारोप करताना बालसाहित्यातून संस्कार आणि नव्या विचारांची रुजवण व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

निबंध वाचनानंतर प्रत्येक निबंधावर सविस्तर चर्चा झाली. या परिसंवादाला नांदेड परिसरातील बालसाहित्यिक, संशोधक, अभ्यासक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.